# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**3 hrs
**Date:** 05-03-2025 | **Paper:** March 2024 (Solution) | **Marks:**80

**1(अ))**
**(1)** (1) (i) नाही ती भानगड
(ii) हात दाखवून अवलक्षण, पेललं नाही तेव्हा खाजगी
(2) (i) एकशे एक्क्याऐंशी पौंड
(ii) (1) प्रोटीनयुक्त पदार्थ (2) चरबीयुक्त द्रव्ये
(3) लेखकाने खाजगी उपोषण सुरू केले. दोन महिन्यांत पन्नास पौंड वजन कमी करण्याची भीष्मप्रतिज्ञा घेतली. आहारशास्त्रावरच्या पुस्तकाचा अभ्यास करून प्रोटीनयुक्त पदार्थ आणि चरबीयुक्त द्रव्ये यांच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवले. कॅलरीजची गणना करून आहार घेऊ लागले. पुरेशी झोप न मिळाल्याने वजन कमी होण्यास मदत होईल असे समजून झोप कमी करण्याचा प्रयत्न केला. वजन कमी करण्याच्या शास्त्रात पारंगत तज्ज्ञांचा सल्ला घेतला. लेखकाने वजन कमी करण्यासाठी खूप कष्ट घेतले आणि त्याला यशही मिळा.

**(आ))**
**(1)** (1) (1) भांडी धुणे
(2) फरशी पुसणे
(2) (i) अभिषेक
(ii) रेखामावशीं
(iii) सुमित
(iv) स्नेहल
(3) हे वाक्य लोकांना सायकल चालवण्याचे फायदे समजून घेण्यासाठी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सायकलचा समावेश करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आहे. सायकल चालवणे हे एक उत्तम व्यायाम आहे. हे हृदय आणि फुफ्फुसांना मजबूत करते, वजन कमी करते आणि तणाव कमी करते. सायकल चालवणे हे प्रदूषण कमी करते. हे हवा आणि पाण्याचे प्रदूषण कमी करते आणि हवामान बदलाशी लढण्यास मदत करते. सायकल चालवणे हे वाहतुकीची कोंडी कमी करते. हे रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी करते आणि लोकांना वेळेवर पोहोचण्यास मदत करते. आपण सर्वांनी या वाक्याचा अर्थ समजून घेऊन आणि आपल्या दैनंदिन जीवनात सायकलचा समावेश करून त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

**(इ))**
**(1)** (1) (1) मानसिक (2) बौद्धिक
(2) स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरता वाढते. लिंगभेद आणि सामाजिक कुप्रथा कमी होण्यास मदत होते. स्त्रियांच्या आरोग्य आणि स्वच्छतेमध्ये सुधारणा होते. शिक्षित स्त्रिया मुलांना चांगले संगोपन आणि शिक्षण देऊ शकतात. समाजामध्ये सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. स्त्रियांच्या रोजगाराच्या संधी वाढतात. कुटुंबाचे उत्पन्न वाढते. दारिद्र्य कमी होण्यास मदत होते. स्त्री शिक्षण हे केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी हिताचे आहे. स्त्री शिक्षणामुळे समाजामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून येतात आणि राष्ट्राचा विकास होतो. म्हणूनच, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

**2(अ))**
**(1)** (1) (i) हात
(ii) अश्रू
(2) (i) दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
(ii) कवीचे हात
(3)

| शब्द | अर्थ |
|---|---|
| 1. दारिद्र्य | गरिबी |

TickMark.Ai

| | |
|---|---|
| 2. हरघडी | प्रत्येक वेळी |
| 3. साहाय्य | मदतीस |
| 4. दुनिया | जग |

(4) नारायण सुर्वे यांच्या 'दोन दिवस' या कवितेत कामगारांच्या जीवनाचे वास्तव चित्रण करताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली', या शब्दांत कवीने भीषण जीवनसत्य मांडले आहे. रोजची भूक भागविण्यासाठी जिचे अपार कष्ट करावे लागतात, या पोटामागे संपूर्ण आयुष्य खर्ची घालावे लागते. अशा कष्टकऱ्यांचे जीवन खूपदा सुखाची वाट पाहण्यात वाया जाते किंवा दुःखाशी झुंज देण्यात, अडचणींचा सामना करण्यातच निघून जाते. त्यांचे आयुष्य रणरणत्या उन्हाळ्याचे असते. पोटाची आग शांत करण्यासाठी त्यांना भाकरीच्या चंद्राची वाट पहावी लागते, तिचा शोध घ्यावा लागतो. अशा कष्टकऱ्यांच्या जीवनातील व्यथा, वेदना मांडून कवीने जीवनसत्याचे दर्शन घडवले आहे. दुःखमय परिस्थितीतही सकारात्मक विचार करत आयुष्य जगणाऱ्या कामगाराचे चित्रण यात घडते.

**(आ))**

**(1)** (१) संत नामदेव.
(२) परमेश्वर कृपेची याचना.
(३) हा अभंग खूप आवडला आहे. संत नामदेवांनी विविध दृष्टांन्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे. माता - बाळ, पक्षीण - पिल्लू, धेनू - वासरू, मेघ - चातक, हरीण - पाडस या उदाहरणाच्या माध्यमातून परमेश्वराला आईप्रमाणे स्वत:चा सांभाळ करावयास संत नामदेव सांगत आहेत. हा अभंग काळजाला भिडतो. आईचे प्रेम व बाळाचे रक्षण या भावनेमुळे हा अभंग फार आवडतो.
(४) दिलेल्या ओळी या संत नामदेव यांच्या संतवाणी अंकिला मी दास तुझा यातील आहेत. प्रस्तुत ओळींच्या माध्यमातून संत नामदेव सांगतात की हे परमेश्वरा मी ज्यावेळी जंगलामध्ये आग लागते किंवा वणवा पेटतो त्यावेळेस सर्व प्राणी हे इकडेतिकडे पडत असतात. तसेच वनवा लागल्यामुळे हरिण देखील व्याकूळ होते कारण तिला माहीत असते की तिचा पाळस म्हणजे तिचा पिल्लू जंगलात कुठेतरी अडकलेला असेल त्यामुळे ती चिंतित होऊन आपल्या पाळसाची काळजी करत असते.संत नामदेव परमेश्वराला सांगतात की हे परमेश्वरा ज्याप्रमाणे ती हरिण आपल्या पिल्लासाठी व्याकूळ होते त्याप्रमाणेच मी देखील तुझ्या दर्शनासाठी व्याकुळ झालेलो आहे. मी देखिल तुझ्यासाठी तेवढाच चिंतित आहे असे परमेश्वराबद्दल असलेले आपले प्रेम संत नामदेव आपल्या कवितेच्या माध्यमातून किंवा संतवाणी च्या माध्यमातून व्यक्त करताना दिसतात.
(५) (i) माता - आई / जननी (ii) कनवाळू - दयाळू
(iii) काज - काम (iv) धेनू - गाय

**(2)** (१) किशोर पाठक
(२) कवीने उज्ज्वल देशाचे स्वप्न रेखाटले आहे.
(३) कवीने कृषीसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकजुटीचे सामर्थ या नैतिक मूल्यांना मांडून समाजाला आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे म्हणून ही कविता माला फार आवडली आहे.
(४) ‘स्वप्न करू साकार’ या कवितेमध्ये कवी किशोर पाठक यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न वर्णन केले आहे. ते करताना कवी देशाची कृषी आणि उद्योग संस्कृती, श्रमशक्ती, आणि एकतेचे सामर्थ्य याचे महत्व स्पष्ट करतो. कवी म्हणतो कि आम्ही या देशाचे लेकरे आहोत. या देशावर, या मायभूमीवर आमचा अधिकार आहे. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण एकजुटीने उभे राहू, नव्या युगाचे नव्या पिढीचे उज्ज्वल भविष्याचे स्वप्न साकार करू असे आवाहन कवी आपल्या देशबांधवांना करीत आहे.
(५) (i) विभव - ऐश्वर्य, भाग्य, संपत्ती (ii) शक्ती - ऐश्वर्य , बल
(iii) विश्व - जग (iv) हस्त - हात

**3)**

**(1)** डॉ. होमी भाभा - डॉ. होमी भाभा हे प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व होते. डॉ. होमी भाभा संस्थेत काम करायला आलेल्या मुलांना म्हणत, सर्वजण संशोधन करत रहा, त्यासाठी सरकारला खर्च किती येतो याचा विचार करू नका, तुम्ही स्वतःच काम निर्माण करा. आपण काय काम करायचं हे स्वतःच ठरवा बॉसने सांगितलं तेवढंच काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामचं नाही अस समजायचं, हे चूक आहे ही प्रवृत्ती गेली पाहिजे. स्वतःला सक्षम करण्याचे पाठ मुलांना देत असत.

**(2)** पणतीच्या उदाहरणातून कवितेत स्पष्ट केले आहे की अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते. प्रचंड तेजस्वी सूर्यालाही मावळताना पृथ्वीची चिंता वाटते कोणीतरी येऊन पृथ्वीला वाचवावे अशी अपेक्षा सूर्य करताना छोटीशी पणती पुढे येऊन नम्रपणे सूर्याला आश्वासन देत म्हणते, माझ्याकडून जेवढे होईल तेवढे मी पृथ्वीला प्रकाशित करण्याचे प्रयत्न करीत राहिन. छोटी पणती आपल्या कतृत्वाने तिच्यापेक्षा अधिक शक्तीशाली सूर्यालाही मदत करते.

**(3)** कॅक्टस' हा वाळवंटी वनस्पतींचे प्रातिनिधिक रूप आहे. वाळवंटी प्रदेशात आढळणाऱ्या अवर्षणाशी तोंड देत जगणाऱ्या वनस्पतींपैकी हा एक महत्वाचा प्रकार आहे. निसर्गाने या झाडाला काही अनोखी वैशिष्ट्ये बहाल केली आहेत जी त्याला या ओसाड, रेताड, पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या मरुभूमीत जगण्यासाठी मदत करते. जेव्हा कधी पाऊस पडतो तेव्हा त्या पावसाचे पाणी कॅक्टस स्वत:मध्ये साठवून ठेवतो आणि कोरड्या दिवसांमध्ये त्या पाण्याच्या सहाय्याने त्याची मंदगतीने वाढ होत जाते. त्याची अंगरचना पाणी साठवण्यासाठी अनुकूल असते. त्याच्या शरीराचा फार कमी भाग कोरड्या उष्ण हवेच्या संपर्कात येतो. कॅक्टसची मुळे जमिनीत लांबवर पसरलेली असतात. त्यांची एक विशिष्ट रचना असते ज्याद्वारे ते कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पाणी शोषून घेतात. बहुतेक कॅक्टसची रचना घडीदार असते त्यामुळे पाऊस पडला कि

TickMark.Ai

या घड्यांचा पन्हाळीसारखा उपयोग होईन ते पाणी खाली जमिनीत थेट मुळांपर्यंत पोहोचते. बाष्पीभवनाचा धोका टाळण्यासाठी या झाडाला पानेच नसतात. या सर्व गोष्टी लक्षात घेता 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' हे विधान पटते.

**4(अ))**

**(1))**
**(1)** आज्ञार्थी वाक्य
**(2)** उद्रारार्थी वाक्य

**(2))**
**(1)** जगात सर्व सुखी असा कोणीही नाही.
**(2)** ही कल्पना वाईट नाही

**(3))**
**(1)** अंगाचा तिळपापड होणे - - खूप राग येणे
वाक्य: विवेकने घरात केलेला पसारा पाहून आईच्या अंगाचा तिळपापड झाला.
**(2)** रममाण होणे - रमून जाणे , गुंग होणे, व्यस्त होणे
वाक्य - सर्व भक्त आषाढी कार्तिकीला विठ्ठल भक्तीत रममाण होतात.
**(3)** झोंकूण देणे – समरस होणे वाक्य - परीक्षेत यशस्वी होण्यासाठी सुरेशने अभ्यासात स्वतःला झोकून दिले.

**(आ))**

**(1))**

**(1))**
**(1)** (i) तरू, वृक्ष (ii) गृह, सदन

**(2))**
**(1)** (1) प्रामाणिक x अप्रामाणिक (2) सावध x बेसावध

**(3))**
**(1)** (1) रस्ता - रस्ते (2) भिंत - भिंती

**(4))**
**(1)** समाजसेवक

**(2))**
**(1)** ग्राहाणी
**(2)** प्रक्रिया

**(3))**
**(1)**

| चिन्ह | नांव |
|---|---|
| ? | प्रश्न चिन्ह |
| ; | अर्ध विराम चिन्ह |
| ! | उद्गार चिन्ह |
| ' ' | एकेरी अवतरण चिन्ह |

**5(अ))**

**(1))**
**(1)** शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र ट्रस्टच्या व्यवस्थापकांना लिहा.

दिनांक: ४ मार्च २०२४
प्रति,
माननीय संचालक
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग
तळेगाव दाभाडे.
hirwaitrust04@gmail.com

TickMark.Ai

विषय: 'वृक्षारोपणासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.'

माननीय महोदय,

मी कुणाल/गायत्री पिंगळे स्वामी ज्ञानसंपदा शाळेची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आपणांस हे पत्र लिहीत आहे. 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त' दिनांक ५ मार्च २०२४ रोजी हिरवाई ट्रस्ट 'झाडे लावा ... झाडे जगवा' हा उपक्रम राबवणार असल्याचे कळले. या उपक्रमात औषधी वनस्पतींच्या, फुलांच्या, फळांच्या रोपांचे मोफत वाटप होणार आहे.

आमच्या स्वामी दयानंद शाळेच्या मोकळ्या मैदानात व शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्याची आमची इच्छा आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात आम्हांला खारीचा वाटा उचलायचा आहे. यासाठी आपणाकडे उपलब्ध असलेल्या विविध रोपांचे प्रकारांनुसार प्रत्येकी ३ नग आपण पाठवून द्यावेत, जेणेकरुन शाळेच्या परिसरात विविध झाडांची लागवड केली जाईल.

आमच्या विनंतीला मान देऊन आपण आम्हांस या स्तुत्य उपक्रमात सहभागी करून घ्याल, अशी आशा वाटते. त्याकरता आपण ही रोपे लवकरात लवकर शाळेच्या पत्त्यावर पाठवून द्यावीत ही नम्र विनंती.

कळावे,
आपली विश्वासू,
कुणाल/गायत्री पिंगळे.
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानसंपदा विद्यालय,
तळेगाव दाभाडे.

किंवा

चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

दि. ४ मार्च २०२४
प्रति,
मा. व्यवस्थापन,
हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग
तळेगाव दाभाडे.

विषय अभिनंदन करण्याबाबत.

महोदय,

सध्या जागतिक तापमानात सतत वाढ होत आहे. पर्यावरण असंतुलित आहे. या सर्वांचे दुष्परिणाम जाणवू लागले आहे. यावर उपाय म्हणजे भरपूर झाडे लावणे व त्यांचे संवर्धन करणे हे प्रत्येक मानवाचे आद्य कर्तव्य आहे.

या पार्श्वभूमीवर आपली हिरवाई ट्रस्ट "झाडे लावा .... झाडे जगवा" हे आपले ब्रीदवाक्य प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विविध प्रकारच्या रोपांचे मोफत वाटप करुन लोकांना वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहित करत आहे. आपल्या मोफत रोपे वाटप उपक्रमामुळे हजारो लोक ही रोपे घेऊन आपल्या परिसरात लावत आहेत. त्यामुळे उजाड, भकास परिसर हिरवंगार होत आहे.

आपला हा मोफत रोप वाटपाचा उपक्रम अभिनंदनास पात्र आहे. आमच्या शाळेचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांच्या वतीने आपले मनःपूर्वक अभिनंदन. धन्यवाद.

धन्यवाद.
आपला विश्वासू,
कुणाल/गायत्री पिंगळे.
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानसंपदा विद्यालय,
तळेगाव दाभाडे.

**(2))**

**(आ))**

**(1))**

**(1)** (1) रु.200/-
(2) 10 ते 15

TickMark.Ai

(3) 25 डिसेंबर ते 27 डिसेंबर
(4) राष्ट्रीय उद्यानातील
(5) जंगल भ्रमंती संस्था

**(2))**

**(1)** आज जागतिक मराठी भाषा दिवस आहे. 27 फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि. वा. शिरवाडकर म्हणजे तुमचे आमचे कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस असतो. त्यानिमित्ताने हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

याचसाठी आम्ही सगळे 'जनता विद्यालय शिरवळ येथील विद्यालयान आयोजित 'मराठी भाषा दिवस' सोहळ्यात सहभागी झालो. कार्यक्रम साधारणपणे सं. 10 वाजता सुरु झाला. कार्यक्रमात कथाकथन, काव्यवाचन, नाट्यप्रयोग तसेच गीतगायन या विविधरंगी कार्यक्रमांनी तिथे जमलेल्या सर्व प्रेक्षकांना कर्णमधूर व बोधात्मक मेजवानी दिली.

मराठी भाषा दिनाचे महत्त्व आपल्यासोबत समाजानेही बाळगावे असे आवाहन माननीय प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक श्री. अरविंद मोरे सरानी दिले. विद्यार्थ्यांचे गुण ओळखून त्यांच्या गुणांना दाद देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे हा मोलाचा सल्ला दिला. यावेळी प्रदेश सरचिटणीस अध्यक्ष श्री. सागर शिंदे कार्यकर्ते उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाचा सोहळा पार पडला.

**(3))**

**(1)** **राजाची युक्ती**

महाराज उदयसिंह आपल्या राज्याची सैर करत असताना त्यांना निदर्शनास आले की राज्यातील प्रजा दिवसेंदिवस आळशी होत चालली आहे. कुणीही जबाबदारीने काम करताना दिसत नव्हते. प्रजेचा आळशीपणा महाराज उदयसिंग च्या चिंतेचे कारण बनले. दिवसेंदिवस प्रजेचा आळशीपणा वाढत गेल्यास राज्याची प्रगती कशी होणार याची चिंता उदयसिंग मला सतावू लागली.

लोकांमध्ये काम करण्याची इच्छा जागृत व्हावी यासाठी त्याने एक युक्ती लढवली. महाराज उदयसिंह यांनी भर चौकामधील मुख्य रस्त्यामध्ये मोठा दगड आणून ठेवला. त्या दगडाखाली सोन्याची नाणी असलेली पिशवी सुद्धा ठेवली. रस्त्यामध्ये दगड असल्यामुळे जाता येता लोकांना अडथळा निर्माण होऊ लागला. अनेकांच्या पायाला या दगडामुळे इजा होते पण कोणीही तो दगड उचलायला तयार होत नाही. हे सर्व एका गरीब माणसाच्या दृष्टीस येते. तो

मोठा दगड बाजूला ठेवण्यासाठी उचलतो. त्याला ती पिशवी ज्यामध्ये सोन्याची नाणी होती ती मिळते. हे सर्व आजूबाजूला असलेल्या लोकांना दिसून येते. मग त्यांना पश्चाताप होतो की आपण हे काम आधीच का नाही केले. या प्रसंगामुळे सर्वांच्या लक्षात येते की काम केले तर आपल्याला यश धन आणि आयुष्यात जे काही पाहिजे असेल ते प्राप्त होईल याच विचारांमुळे सर्वजण उद्योगी बनतात. तात्पर्य : जीवनामध्ये यशस्वी बनायचे असेल तर आळस सोडून प्रयत्नशील बनावे.

TickMark.Ai

**(इ))**

**(1))**

**(1)** शालेय प्रजासत्ताक दिन

२६ जानेवारी म्हणजे प्रजासत्ताक दिन माझ्या शाळेत प्रजासत्ताक दिनानिमीत्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ध्वजारोहनाच्या कार्यक्रमाची वेळ ही सकाळी सात वाजत होती, म्हणून मी आधल्या दिवशीच माझ्या शाळेचा ड्रेस स्वच्छ धुवून इस्त्री केला.व सकाळी लवकर उठून आंघोळ करून शाळेत गेलो,तर बघतय तर काय शाळेत सर्वत्र देशभक्तिच वातावरण होत. सर्वत्र देशभक्तिवर गीत सुरू होते.

ध्वजारोहनाच्या कार्यक्रमाचे स्थळ म्हणजे माझ्या शाळेचे मैदान. संपूर्ण शाळेचे मैदान हे अगोदरल्या दिवशी नीट स्वच्छ करून त्यावर रांगेत उभे राहण्याकरिता सरळ रेषा पांढऱ्या चुन्याने आखून घेतल्या होत्या. आणि वर तोरणे लावण्यात आली होती. सर्वत्र उत्सवाच वातावरण होत. मग पटापट शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांच्या सरळ रेषेत रांगा लावल्या. आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आले. त्यानंतर ध्वजारोहन करण्यात आले.सर्वांनी राष्ट्रीय झेंडा तिरंगा याला सलामी दिली,आणि मग राष्ट्रीय गीत व प्रतिज्ञा झाली. नंतर विधार्थ्यांनी तयार केलेली देशभक्तिवर गीत म्हणण्यात आले. आणि मग प्रमुख पाहुणे आणि शाळेचे मुख्याध्यापक यांची भाषणे झाली.

प्रजासत्ताक दिनानिमीत्त शाळेमध्ये विविध सांसस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये देशभक्तिवर नाटक, नृत्य आणि भाषण होते. मी पण सांसस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाषण दिले.आणि नाटक पण सादर केले त्यामध्ये माझे खूप कौतुक झाले.प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी आपले योगदान दिले व सहभाग दिले.त्यानंतर आभार प्रदर्शन करण्यात आले आणि सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आले आणि प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अशा प्रकारे माझ्या शाळेतील प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम झाला.

तर हे होत शाळेतील प्रजासत्ताक दिन प्रसंगलेखन मराठीमध्ये तुम्हाला प्रसंग लेखन कस वाटल तर काही टिप्पणी करून नक्की कळवा, आणि आपल्या सोशल मीडिया वर शेअर करा धन्यवाद. 'भेटूया पुढच्या लेखामध्ये'.

**(2))**

**(1)** **मी क्रीडांगण बोलत आहे.....**

'काय दोस्ता, आलास? परीक्षा संपली वाटतं? तुम्ही सर्व आलात की कसं बरं वाटतं! त्यानिमित्ताने का होईना, माझ्यावर टाकलेले दगड-धोंडे, कचरा दूर केला जातो. तुमच्या किलबिलाटाने, दंगामस्तीने मी गजबजून जातो, आनंदून जातो.

सकाळची कोवळी उन्हे घेण्यासाठी, दुपारी जेवल्यानंतर शतपावली करण्यासाठी, संध्याकाळी मित्रमैत्रिणींसोबत

खेळण्यासाठी, रात्री फेरफटका मारण्यासाठी जेव्हा तुम्ही माझ्याजवळ येता तेव्हा मला खूप आनंद होतो. पावसात तुम्ही इथे चिखलात फुटबॉल खेळायला येता, डबक्यातल्या पाण्यात होड्या सोडता, माझ्यावर दणादण उड्या मारता तेव्हा माझंही मन ओलंचिंब होऊन जातं. तुम्ही नसलात, की नुसता शुकशुकाट असतो. मग काय, कुठल्या राजकारण्याची सभा किंवा साखरपुड्यासाठी, सणाकार्यक्रमांसाठी लोक माझा वापर करण्याची संधी सोडत नाहीत; पण खरं सांगू का? मला खेळासाठीच हक्काचं अंगण म्हणूनच जर तुम्ही मान दिलात, तरच मला जन्म सार्थकी लागल्यासारखा वाटेल.

आज मैदानी खेळ खेळण्यापेक्षा मुलांना मोबाइल, संगणकामधील यांत्रिक खेळ खेळण्यात अधिक रस वाटत आहे. लहान वयातच लठ्ठपणा, मानदुखी, डोळ्यांच्या विकारांना आयतं आमंत्रण मिळालं आहे. शिवाय, माझ्यापेक्षा टीव्हीचा वाढता प्रभाव आहेच. तासनतास मनोरंजनाच्या या 'इडियट बॉक्स' समोर बसून आपला वेळ वाया घालवणाऱ्या, तळलेले, खारट पदार्थ खात डोळ्यांवर जाड भिंगांचा चष्मा सावरणाऱ्या माझ्या दोस्तांना पाहून मला खूप वाईट वाटतं; पण माझा नाइलाज आहे रे. आपल्या व्यस्त जीवनक्रमांतून खेळण्यासाठी वेळ काढणे त्यांना कठीणच होऊन बसले आहे.

हल्ली टोलेजंग इमारती बांधणारे विकासक आमच्यावर अतिक्रमण करुन त्याजागी भलेमोठे घरांचे प्रकल्प उभारत आहेत. आमची जागा हळूहळू दुकाने, मॉल्स उभारण्याकरता विकली जात आहे. प्रगतीच्या नावाखाली आमच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. हे जर असेच चालू राहिले, तर भविष्यात मुले खेळणार कुठे? जर तुम्ही खेळलात, तर मी टिकून राहीन. नाहीतर माझे अस्तित्वच नष्ट होईल किंवा खेळांडूपुरतेच माझे अस्तित्व मर्यादित राहील, म्हणून सांगतो, रोज खूप खेळा... माझ्याजवळ या... या चिमण्यांनो परत फिरा... याल ना?"

**(3))**

**(1)** **मी माझ्या देशाचा नागरिक**

मी माझ्या देशाचा एक जबाबदार नागरिक आहे. मला माझ्या हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव आहे. मी देशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्याच्या प्रगतीसाठी योगदान देण्यासाठी सदैव तत्पर आहे.

मला माझ्या देशाच्या सदयस्थितीचे ज्ञान आहे. मला देशासमोर असलेल्या आव्हानांची आणि संधींची जाणीव आहे. मी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देण्यासाठी प्रयत्नशील आहे. मी माझ्या वर्तणुकीतून एकआदर्श नागरिक असल्याचे दर्शवितो. मी कायद्याचे पालन करतो आणि इतरांनाही ते पालन करण्यास प्रोत्साहित करतो. मी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखतो आणि इतरांनाही तेच करण्यास प्रेरित करतो.

माझ्या मनात देशप्रेम आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ आहे. मला माझ्या देशाचा अभिमान आहे आणि मी त्याचा सन्मान करतो. मी देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा बाळगतो. मी माझ्या देशाचा नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. मी माझ्या देशासाठी काय करू शकतो? मी देशाच्या कायद्यांचे पालन करू शकतो. मी माझ्या कर द्यायला कधीही टाळाटाळ करणार नाही. मी माझ्या देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्यासाठी कठोर परिश्रम करू शकतो. मी देशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सदैव तत्पर आहे. मी माझ्या देशाचा सन्मान करू शकतो आणि इतरांनाही तेच करण्यास प्रोत्साहित करू शकतो. मी देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा बाळगतो.

मी माझ्या देशाचा एक जबाबदार नागरिक आहे आणि मला माझ्या देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा आहे.

**All the Best**

TickMark.Ai